प्रकरण पाच :

# आढळलेल्या बाबी, निष्कर्ष आणि सूचना

# प्रकरण पाचवे

## आढळलेल्या बाबी, निष्कर्ष आणि सूचना

कोल्हापूर शहरातील असंघटित क्षेत्रातील १२५ हमाल प्रतिसादकांच्या सामाजिक - आर्थिक जीवनाचा अभ्यास मुलाखत अनुसूची-द्वारे केला. पाहणीअंती संपादित माहितीच्या विश्लेषणावरून आढळून आलेल्या बाबी, निष्कर्ष आणि त्यावरील सूचना स्पष्ट करण्याचा प्रयत्न या प्रकरणात केला आहे.

### [१] आढळलेल्या बाबी :

हमालांच्या सामाजिक - आर्थिक जीवनाची पार्श्वभूमी, त्यांची आर्थिक स्थिती व त्यांचे कौटुंबिक जीवन यासंबंधी सारणीमधील संपादित माहितीचे विश्लेषण केल्यानंतर पुढील बाबी आढळून आल्या.

#### १. पुरूष प्रमाण अधिक :

सामान्यत: हमाली व्यवसाय पुरूषांचा आहे. हमालीमध्ये पुरूष अधिक असून स्त्रिया नगण्य आढळल्या. पाहणी अंती १२५ हमालांमध्ये पुरूषांचे प्रमाण अधिक [११७ म्हणजे ९३.६ टक्के] होते.

#### २. मध्यमवयीन हमालांचे प्रमाण अधिक :

हमाली व्यवसायामध्ये मध्यमवयीन हमाल संख्येने अधिक असतात. पाहणी केलेल्या हमालांमध्ये मध्यमवयीन हमालांचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे १२५ हमालांपैकी ९० [७२ टक्के] हमाल २१ ते ४० वयोगटातील होते.

३. मराठा जातीच्या हमालांचे आधिक्य :

आजवर झालेल्या इतर अभ्यासाहून भिन्न असे जातीप्रमाण कोल्हापूर शहरातील हमालांच्या अभ्यासामधून आढळले. प्रा. वसंत देशपांडे यांच्या पुण्यामधील हमालांच्या अभ्यासामधून मराठा जाती-प्रमाणेच अनुसूचीत जातीचे हमाल [४५ टक्के] आढळले. परंतु कोल्हापूर शहरातील हमालांच्या पाहणीअंती मराठा जातीतील हमाल सर्वाधिक [६४.८ टक्के], तर अनुसूचित जातीचे हमाल कमी [८ टक्के] होते.

४. निरक्षरता व अक्षरओळख असलेल्या हमालांचे आधिक्य :

हमालांमध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी असते. १२५ हमालांपैकी ७१ [५६.८ टक्के] हमाल निरक्षर होते. तसेच, साक्षर हमालांमध्ये सुद्धा अक्षर ओळख असलेल्या हमालांचे प्रमाण अधिक होते.

५. आर्थिक पार्श्वभूमी :

हमालांची स्थावर मालमत्ता व शेतीमधील मासिक उत्पन्न यावरून त्यांची आर्थिक स्थिती स्पष्ट होती.

[अ] अल्पभूधारकांचे आधिक्य :

हमालांमध्ये अल्पभूधारक व भूमिहीन अधिक आढळतात. पाहणी-पैकी २९ [२३.२ टक्के] हमाल भूमिहीन होते, तर ९६ [७६.८ टक्के] भूधारक असले तरी त्यापैकी ९२ [७३.६ टक्के] हमालांची जमीन ५ एकर किंवा त्यापेक्षा कमी होती.

[ब] **शेतीमधील अत्यल्प उत्पन्न :**

सर्वच हमाल अल्पभूधारक तसेच भूधारकांची शेतजमीन कोरडवाहू, जिराईती, डोंगराळ असल्याने शेतीमधील मासिक उत्पन्न अत्यल्प आढळले. भूधारकांपैकी ९३ [९६.८६ टक्के] हमालांचे शेतीमधील मासिक उत्पन्न ५०० रु. पेक्षा कमी होते.

६. **स्थलांतरीत हमालांचे आधिक्य :**

सामान्यत: हमाल ग्रामीण भागातून शहरांकडे स्थलांतरीत झालेले असतात. १२५ हमालांपैकी १२१ [९६.८ टक्के] हमाल ग्रामीण भागातून स्थलांतरीत झालेले होते. स्थलांतरीत हमालांमध्ये जिल्हा अंतर्गत स्थलांतर करणारे हमाल सर्वाधिक [९४ म्हणजे ७५.२ टक्के] आढळले.

७. **तरुण हमालांचे आधिक्य :**

हमाली कामामध्ये वयाची निश्चित मर्यादा नाही. तरीही शारीरिक कष्टाच्या कामामुळे बहुतांशी हमाल तारुण्यातच हमाली व्यवसायात प्रवेश करतात. पाहणी केलेल्या १२५ हमालांपैकी ८९ [७१.२ टक्के] हमालांनी १६ ते २५ वयाच्या दरम्यान प्रवेश केल्याचे आढळले.

८. व्यवसाय प्रवेशाची कारणे :

हमालांच्या आर्थिक पार्श्वभूमीचा व स्थलांतराच्या पार्श्वभूमीचा वेध घेता, व्यवसाय प्रवेशाबाबत अल्पभूधारकता, भूमिहीनता आणि दुष्काळ हीच प्रमुख कारणे आढळली.

दुष्काळामुळे स्थलांतरीत झालेले व हमाली व्यवसायात आलेल्यांचे प्रमाण १६ [१२.८ टक्के] आढळले. सोलापूर, उस्मानाबाद व सांगली तसेच कर्नाटक राज्यातील बेळगाव व विजापूर हे जिल्हे अवर्षणग्रस्त प्रदेश म्हणून ओळखले जातात. त्यामुळे तेथील काही लोकांनी हमाली व्यवसाय स्वीकारल्याचे आढळले.

९. हमालांचे अल्प मासिक उत्पन्न :

१००० रु. पेक्षा कमी मासिक उत्पन्न असणारे हमाल ८४ [६७.२ टक्के] आढळले. तुलनेत, वाहतूक विभागातील हमालांचे उत्पन्न जास्त आढळले. १००१ पेक्षा अधिक उत्पन्न असणाऱ्यांमध्ये वाहतूक विभागातील हमालांचे प्रमाण अधिक होते. अल्प मासिक उत्पन्नामुळे हमालांमध्ये बचतीचे प्रमाणसुद्धा कमी [४ टक्के] आढळले.

१०. सुविधा व सवलतींचा अभाव :

संघटित क्षेत्रातील कामगारांप्रमाणे हमालांना कोणत्याही सुविधा व सवलती उपलब्ध नाहीत. हमालांसाठी पगारी सुट्टी, पगारी

....१०६/-

रजा, आजारी रजा, निवृत्ती वेतन, नुकसान भरपाई इ. सवलती मिळत नाहीत. तसेच कामाच्या ठिकाणी विश्रांतीगृह, स्वच्छता गृह व प्रथमोपचार या सोयी उपलब्ध नाहीत. विशेष बाब म्हणजे, हमालांना महागाईचा वाढता दर लक्षात घेऊन वार्षिक वेतनवाढ मिळालेली नाही.

११. मद्यपी व्यसनींचे प्रमाण अधिक :

शारीरिक ताण कमी करण्यासाठी मद्यपान करणारे हमाल अधिक आढळले. १२५ हमालांपैकी ६० [४८ टक्के] हमाल मद्यपी होते.

१२. कौटुंबिक जीवन :

हमालांच्या कौटुंबिक जीवनविषयक संपादित माहितीच्या विश्लेषणावरुन पुढील बाबी स्पष्ट होतात :-

[अ] निरक्षरता आणि अक्षरओळख असणा-या कुटुंबियांचे आधिक्य :

हमालांच्या कुटुंबामधील शिक्षण प्रसाराचे विश्लेषण करता हमालांच्या कुटुंबामध्ये निरक्षरतेचे प्रमाण अधिक [५१.१५ टक्के] आढळले. परंतु हमालांच्या अपत्यांमध्ये शिक्षण-प्रसार झालेला दिसून येतो. हमालांच्या अपत्यांमध्ये साक्षरतेचे प्रमाण ९०.८० टक्के असले तरी, अक्षरओळख असणा-या मुलांचे प्रमाणच अधिक [६४.४२ टक्के] होते. याबाबतीत स्त्रीशिक्षणाबद्दल अनास्था, आर्थिक दारिद्र्य, शैक्षणिक सुविधांचा अभाव, शिक्षणाबद्दल अनास्था इ. कारणे आढळली.

[ब] अनिवासी हमालांचे आधिक्य :

निवासस्थानानुसार वर्गीकरणाचे विश्लेषण करता, अल्प व अनिश्चित मासिक वेतनामुळे हमालांना कोल्हापूरमध्ये, कुटुंबासहित वास्तव्य आर्थिकदृष्टया शक्य होत नाही. त्यामुळे बहुतांशी हमाल [५५.२ टक्के] कामाच्या ठिकाणी गुदामामध्ये अथवा दुकानात राहतात. कोल्हापूरमध्ये राहणा-यांमध्ये भाडोत्री झोपडी वजा कच्च्या मातीच्या घरात राहणारे हमाल अधिक [३८.४ टक्के] होते, तर केवळ ६ टक्के हमालांचे मालकीचे घर होते. कोल्हापूरमध्ये राहणारे तसेच मालकीचे घर असणा-यांमध्ये वाहतूक विभागातील हमाल अधिक आढळले.

थोडक्यात, संपादित माहितीचा मागोवा घेता, हमाल हे स्थलांतरीत असून आर्थिक दृष्टया मागासकुटुंबामधून स्थलांतरीत होतात, तसेच, अल्प मासिक वेतनामुळे कामाच्या ठिकाणी कुटुंबासहित वास्तव्य करणे त्यांना शक्य होत नाही.

[२] निष्कर्ष :

अभ्यासासाठी निवडलेल्या हमालांच्या पाहणीवरून हमालांची प्राथमिक माहिती, आर्थिक पार्श्वभूमी, स्थलांतराची पार्श्वभूमी, व्यवसाय व व्यवसाय प्रवेशाची कारणे, हमाली व्यवसायातील मासिक उत्पन्न, सोयी व सुविधा, कौटुंबिक जीवन इत्यादी घटकांच्या विश्लेषणावरून खालीलप्रमाणे निष्कर्षाचे प्रतिपादन करता येईल.

आर्थिक दारिद्र्यामुळे व्यवसाय स्वीकृती :

आर्थिक दारिद्र्यामुळे ग्रामीण भागातील लोक हमाली व्यवसायामध्ये प्रवेश करतात. हमालांमध्ये अल्पभूधारक हमालांचे प्रमाण अधिक असते. जिराईती - कोरडवाहू, डोंगराळ शेतजमीन यामुळे शेतीमधील उत्पन्न अत्यल्प असते. तसेच, दुष्काळ व सततचे अवर्षण यामुळे शेती पूर्णत: ऋतूमानावर अवलंबून असते. तसेच, ग्रामीण भागातील भूमिहीन लोकांच्या बाबतीत शेतीमधील रोजगार हंगामी व कमी असतो. परिणामी भूमिहीन लोक रोजगाराच्या शोधार्थ हमाली व्यवसायाकडे वळतात.

[३] सूचना :

कोल्हापूर शहरातील हमालांच्या अभ्यासामधून त्यांच्या सामाजिक - आर्थिक जीवनाच्या आकलनातून हमालांच्या अडचणी, समस्या समजून आल्या. हमाल असंरक्षित कामगार आहे. नियमित व सातत्यपूर्ण, काम आणि निवृत्तीवेतन या बाबी अशक्य असल्या तरी काम व वेतन याबाबतीत काही निश्चित उपाय योजल्यास हमालांच्या सामाजिक - आर्थिक जीवनामध्ये सुधारणा होऊ शकेल. यादृष्टीने काही विधायक सूचना मांडण्याचा प्रयत्न करीत आहे.

[१] हमालांच्या कामाची वेळ निश्चित करण्यात यावी.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

[२] संघटित क्षेत्रातील कामगारांप्रमाणे पगारी सुट्टी, पगारी रजा, आजारी रजा या सुविधा हमालांसाठी सुरू कराव्यात.

[३] हमालांना वार्षिक वेतनवाढ नियमित व महागाईचा वाढता दर लक्षात घेऊन मिळावी. यासाठी व्यापारी प्रतिनिधी, संघटना प्रतिनिधी व मंडळ यांच्या कराराबरोबरच "माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार [नोकरीचे नियमन व कल्याण]" कायदा १९६९ मध्ये दुरूस्ती करून स्पष्ट तरतूद करावी.

[४] अल्प वेतनामुळे हमालांना अडचणी व संकटकाळी पैसा उपलब्ध होऊ शकत नाही. म्हणून संघटित क्षेत्रातील कामगारांप्रमाणे आकस्मित निधीची सोय करून वेतनामधून त्याची कपात करावी.

[५] हमालांचा अधिक वेळ कामाच्या ठिकाणी व्यतीत होत असल्याने व शारीरिक कष्टाचे काम असल्याने कामाच्या ठिकाणी विश्रांती गृह, स्वच्छता गृह व प्रथमोपचारांच्या सोयी सुरू कराव्यात. याबाबतीत व्यापारी व मालक यांना सक्तीचे नियम करावेत.

[६] हमालांसाठी बेघर योजनेप्रमाणे कामाच्या ठिकाणी, शहरांमध्ये अल्पदरात भूखंड अथवा गृहबांधणी योजना सुरू करावी.

[७] हमालांच्या कामाचे स्वरूप व प्रकार निश्चित करून प्रत्येक प्रकारचे वेतन, दर निश्चित करावेत. यामध्ये विनावेतन कराव्या लागणाऱ्या कामांचाही समावेश करावा.

[८] एकाच प्रकारचे काम करणाऱ्या हमालांचे वेतनसमान असावे.

...११०/-

[९] हमालांना नुकसान भरपाई व औषधोपचार खर्च माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाकडून पुरेसा मिळावा, यासाठी असलेल्या तरतुदीमध्ये वाढ करावी.

[१०] हमालांसाठी सक्तीची विमा योजना सुरु करुन व्यापा-यांकडून त्यांची अंमलबजावणी होणेचे दृष्टीने प्रयत्न व्हावेत.

[११] हमालांमध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण अधिक असलेने व्यसनावर पैसा अधिक खर्च होतो. यादृष्टिने संघटनेच्या माध्यमातून हमालांचे प्रबोधन व प्रयत्न व्हावेत.

[१२] हमालांचे वेतनाप्रमाणे व ऐपतीप्रमाणे सक्तीची बचत योजना सुरु करावी.

[१३] हमालांसाठी सहभागी भविष्य निर्वाहनिधीची तरतूद असली तरी उपलब्ध होणारे काम, प्रमाण पाहता भविष्यनिर्वाहनिधी अल्प ठरतो. त्यासाठी माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाच्या अखत्यारीत व्यापा-यांकडून जमा होणा-या लेव्हीचे प्रमाण वाढवावे. तसेच, शासनाने भविष्यनिर्वाहनिधीमध्ये सहभाग घ्यावा.

या सर्व सूचनांची प्रभावी अंमलबजावणी होणेसाठी माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाच्या अधिकारांची व्याप्ती वाढविणे व मंडळाचे कार्य अधिक प्रभावी होणेचे दृष्टीने संघटित प्रयत्न होणे गरजेचे आहे.

...APUR ★ ...SITY

...१११/-

# परिशिष्ट

## -: मुलाखत अनुसूची :-

### विभाग - १ प्राथमिक माहिती :-

१. हमालाचे नांव :-

२. लिंग :-

३. वय :-

४. धर्म :-

५. जात :-

६. शिक्षण :-

### विभाग - २ कामाचे स्वरूप :-

१. हमाली कामाचा प्रकार : १. वाहतूक २. कृषि-उत्पन्न-विनिमय विभाग ३. धान्यबाजार

२. रोज किती तास काम करावे लागते? :

३. कामाची वेळ :

४. रोजच्या रोज काम मिळते काय? :

५. महिन्यातून बेकारीचे दिवस किती? :

६. काम कुणामार्फत मिळते? : अ. कंत्राटदार
ब. संघटना
क. माथाडी बोर्ड
ड. स्वत:

७. काम, वेतन इ. बाबतीत मुकादम व्यापारी इ. चा दबाव असतो काय? : होय / नाही

८. कामावरुन कमी करताना/कामावर घेताना माथाडी मंडळ, संघटना इ. ची संमती घेतली जाते का? : होय / नाही

९. एकावेळी किती ओझी उचलता? :

१०. व्यापा-यांच्या घरची कामे करावी लागतात का? : होय / नाही

११. असल्यास, त्याचा मोबदला किती मिळतो? :

१२.

<u>विभाग - ३</u> <u>मिळकत</u> :-

१. हमाली हाच मुख्य व्यवसाय आहे काय? : होय / नाही

२. नसल्यास करत असलेला इतर व्यवसाय कोणता? :

३. हमालीतून मिळणारे उत्पन्न : १. दिवसाला
२. आठवड्याला
३. मासीक

४. मासीक उत्पन्नातून बचत करता काय? : होय / नाही

५. बचत करीत असल्यास महिन्याला किती? :

## विभाग - ४ व्यसन :-

१. व्यसन : अ. तंबाखू
   ब. विडी-सिगारेट
   क. मद्यपान
   ड. जुगार
   इ. वेश्यागमन

२. व्यसनाचा दिवसाकाठी खर्च :

## विभाग ५ - सुविधा व सवलती :-

१. नियमाप्रमाणे काम मिळते काय? : होय / नाही.

२. नसल्यास, कारण :

३. महागाई लक्षात घेता दरवाढ मिळते काय? : होय / नाही

४. दरवाढ किती वर्षांनी मिळते? :

५. निवृत्तीवेतन, भविष्यनिर्वाहनिधीची सोय आहे काय? : होय / नाही

६. कामाच्या ठिकाणी अपघात झाल्यास –

अ. नुकसान भरपाई मिळते का? : होय / नाही
ब. मिळत असल्यास, कुणाकडून : १. माथाडी बोर्ड, २. संघटना ३. मालक
क. आजारी असल्यास पगारी रजा मिळते काय? : होय / नाही

७. कामाच्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोय आहे काय? : होय / नाही

८. कामाच्या ठिकाणी प्रथमोपचाराची सोय आहे काय? : होय / नाही

९. कामाच्या ठिकाणी स्वच्छता गृहाची सोय आहे काय? : होय / नाही

विभाग – ६ संघटना :-

१. हमाल संघटनेचे सभासद आहात का? : होय / नाही
संघटनेचे नांव –

२. संघटनेचे सभासद नसल्यास कारण :

३. संघटनेने हमालांसाठी काय केले? :
[उपक्रम, प्रश्न सोडवणूक इ. ]

४. संघटनेमुळे कोणता फायदा झाला? :

## विभाग ७ - कौटुंबिक पार्श्वभूमी :

१. प्रतिसादक : विवाहित / अविवाहित / विधूर / घटस्फोटीत

२. कुटुंबाची एकूण संख्या [सदस्य] :

३. कुटुंबातील एकूण काम करणाऱ्यांची संख्या :

४. एकूण प्रौढ : एकूण साक्षर :

५. प्रतिसादकास एकूण अपत्य :

६. मुले शाळेत जातात काय? : होय / नाही

७. शाळेत जात नसल्यास, कारण : संख्या -

८. काहींनी शाळा मध्येच सोडली आहे काय? : होय / नाही

९. शाळा मध्येच सोडण्याचे कारण : संख्या -

१०. कुटुंब सदस्यांचे शिक्षण :
   १. ४थी पर्यंत :
   २. ५वी ते ७वी पर्यंत :
   ३. ८वी ते १०वी पर्यंत :
   ४. १२वी पर्यंत :
   ५. पदवी पर्यंत :

## विभाग - ८ आर्थिक पार्श्वभूमी

१. स्थावर मालमत्ता आहे काय? : होय / नाही

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

२. असल्यास, कोणात्या स्वरूपात :

३. शेती :

४. शेती कोण करते? :

५. शेतीतून मिळणारे वार्षिक उत्पन्न:

६. शेतीवर अवलंबून असणा-या कुटुंब सदस्यांची संख्या :

७. निवारा / घराचा प्रकार :
(कोल्हापूर) :
१. भाडोत्री / मालकीचे
२. झोपडी / कच्च्या मातीचे / पक्के घर.
३. ठिकाण

८. स्थलांतरीत असल्यास, मूळ गांवी निवासाची सोय :
१. भाडोत्री / मालकीचे
२. झोपडी / कच्च्या मातीचे घर / पक्के घर.

## विभाग ९ - स्थलांतराची पार्श्वभूमी :

१. कोल्हापूरात बाहेरुन आलात का? : होय / नाही

२. मूळ गांव : तालुका : जिल्हा :

३. स्थलांतर कुणी केले ? : एकटयाने / कुटुंबाने

४. स्थलांतर कोणात्या वर्षी केले? :

५. हमाली कामात पडण्याचे कारण? :

विभाग १० - व्यवसाय अनुभव :

१. कामाच्या ठिकाणी जातीभेद पाळता? : होय / नाही.

२. जातिभेदाचे स्वरूप :

३. मागासवर्गीय असल्यास कामाच्या ठिकाणी व्यापारी, मालक, मुकादम, सहकारी इ. कडून सापत्न वागणूक मिळते काय? : होय / नाही

४. माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, संघटना हमालांच्या हक्कासाठी जागरूक असते काय? : होय / नाही

५. व्यापारी, मालक कायदयाप्रमाणे वागणूक देतात काय? : होय / नाही

विभाग ११ - सूचना :

हमालांचे सामाजिक - आर्थिक जीवनमान सुधारण्यासाठी तुम्हाला कोणते उपाय सुचवावेसे वाटतात?